**नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ मधील बाबींवर आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी स्थापन केलेल्या व्दिसदस्यीय समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः नाजक २०१८/प्र. क्र.५१/भाग-१/नाजकधा-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक:- १० ऑक्टोबर, २०१९

<u>वाचा</u> :-

१) शासन निर्णय क्र. नाजक २०१७/प्र. क्र. ६३/नाजकधा-२, दिनांक-१६.०६.२०१७.
२) द्विसदस्यीय समितीचा दि.९.८.२०१८ रोजीचा अहवाल.
३) दि.१८.११.२०१८ रोजीच्या मा. मंत्रिमंडळ बैठकीचे कार्यवृत्त.
४) मा. सर्वोच्च न्यायालयासमोरील सि.अ.क्र.५५८/२०१७ मधील दि.०२.०७.२०१९ रोजीचे आदेश.
५) शासन निर्णय क्रमांक-नाजक २०१८/प्र. क्र.५१/नाजकधा-१, दिनांक:- १ ऑगस्ट, २०१९.

**<u>प्रस्तावना</u> :-**

नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ मधील तरतुदी विचारात घेऊन मुळ अधिनियमाच्या कलम २० अन्वये सूट देण्यात आलेल्या जमिनी व अन्य बाबी संदर्भात श्री.बी.एन.श्रीकृष्ण व श्री.बी.एन.मखिजा यांच्या व्दिसदस्यीय समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने दि.१८.११.२०१८ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णयानुसार दि.१.८.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर मंत्रिमंडळ निर्णयानुसार विविध प्रयोजनातून शासनास उपलब्ध होणारा निधी एकत्रित / संचित निधीत जमा करण्यासाठी नविन लेखाशिर्ष निर्माण करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे नवीन लेखाशिर्ष निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ मधील तरतुदी विचारात घेऊन मुळ अधिनियमाच्या कलम २० अन्वये सूट देण्यात आलेल्या जमिनी व अन्य बाबी संदर्भात व्दिसदस्यीय समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने दि.१८.११.२०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार सदर प्रकरणी विविध प्रयोजनातून शासनास उपलब्ध होणारा निधी एकत्रित / संचित निधीत जमा करण्यासाठी खालीलप्रमाणे मुख्य लेखाशिर्ष, उप लेखाशिर्ष, गौणशिर्ष व उद्दीष्टे निहाय नवीन लेखाशिर्ष निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष मराठी | लेखाशिर्ष इंग्रजी |
|---|---|---|
| १. | ०२१७ - नगर विकास विभाग | 0217 – Urban Development Department |
| | ६०, इतर नगर विकास योजना | 60, Other Urban Development Schemes |
| | ८००, इतर जमा रकमा | 800, Other Receipts |
| | ०१ इतर जमा रकमा | 01 Other Receipts |
| | (०१) (०९) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ च्या कलम २० अन्वये सुट देण्यात आलेल्या जमिनीबाबत मिळालेले शुल्क व अधिमूल्याची रक्कम | (01) (09) The fees/premium amount received from the lands exempted under Section 20 of the Urban Land (Ceiling and Regulation) Act, 1976. |
| | (०२१७ ०१९७) | (0217 0197) |

२. सदरहु शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक-१६६/१९/व्यय-३, दि.१९.०८.२०१९, अनौ.सं.क्र.१२७/अर्थ-१६, दि.१९.८.२०१९ आणि महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ख.वि./चा.-१ नगर विकास विभाग/यूओआर-८३/२०१९-२०/६६०, दि.२७.९.२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९१०१०१६५९५७७३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Samadhan Vasantrao Khatkale

Digitally signed by Samadhan Vasantrao Khatkale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3cc48a0aa3fbc01f7ee956a75c9445a5b81fec5e429c69234939d35b4eaceee0, cn=Samadhan Vasantrao Khatkale
Date: 2019.10.11 12:33:42 +05'30'

**(समाधान खटकाळे)**
**अवर सचिव, नगर विकास विभाग**

**प्रत,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३) मा.सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.अपर मुख्य सचिव / मा.प्रधान सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई
६) मा.प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) मा.प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) मा.प्रधान सचिव /सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नाशिक, नागपूर.
१०) जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, नागपूर, सांगली, सोलापूर, नाशिक, कोल्हापूर नागरी समुह.
११) महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, पुणे, नागपूर, सांगली-मिरज-कुपवाड, सोलापूर, नाशिक, कोल्हापूर.
१२) महालेखापाल -(लेखा व अनुज्ञेयता)१, मुंबई.
१३) सर्व सह सचिव, उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) वित्त विभाग, कार्यासन व्यय-७ / कार्यासन अर्थसंकल्प -१६, मंत्रालय, मुंबई.
१५) निवडनस्ती (नाजकधा-१,२,३), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.